# ।। स्वामी को संवाद ।।
# मारवाडी + मराठी
# सत्संग

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

* वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

।। अथ स्वामी को संवाद लिखंते ।।

।। श्लोक ।।

संत सुखरामजी स्वामी ने बूजियो ।। सुरता बगता आप ही हुवा ।।
स्वामी सिन्यास कहो हो कंहा से आये ।। देह धर जुग में किण पेल गाये ।।
ओऊँ अजपा की किण रीत होई ।। कहे सुखदेवजी दे भेद मोई ।।१।।

हे स्वामी,संन्यास धर्म कोठून आला?व हा संन्यास धर्म मनुष्य देहात जगात सर्व प्रथम कोणी धारण केला?ओअम व अजप्पाच्या साधनेची काय रीत आहे?हे स्वामी,हा भेद मला दे.।।१।।

स्वामी कहे सुणो सुखदेवजी ।। सिन्यास शिव सूं चल आये ।।
देह धर जुग में दत्त पेल गाये ।। ओऊँ स अजपो सुण वाय होई ।।
धर ध्यान न्यारो लखे जन कोई ।।२।।

स्वामीने आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना सांगितले की,धरतीवर हा संन्यास धर्म शिवशंकरा पासून कैलासाहून आला.धरतीवर मनुष्य देहाने सर्व प्रथम दत्तात्रयाने धारण केला.ओअम व अजप्पा ही पवनची साधना म्हणजे श्वासाची साधना आहे हा पवन म्हणजे श्वास ओअम,सोहम,अजप्पा या तिघांचा बनला आहे.ओअम,सोहम तसेच अजप्पाची साधना साधण्याची रीत वेगळी वेगळी आहे. ।।२।।

चोपाई ।।

कोण देश में मंढी तुमारी ।। कोण सबद कूं गावो ।।
सुखदेव कहे सुणो सामीजी ।। किसे पंथ कूं ध्यावो ।।३।।

हे स्वामी,तुमची मढी म्हणजे राहण्याचे ठिकाण(वास)कोणत्या देशात आहे.हे स्वामी, तुम्ही कोणत्या शब्दाला भजतात.हे स्वामी,तुम्ही श्वास शब्दाला भजतात की,श्वासाच्या पलिकडील सतशब्दाला भजतात.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सुखरामजी महाराजांनी स्वामीला विचारले की,तुम्ही कोणत्या पंथावर चालतात.तुम्ही त्रिगुणी माया या गृहस्थी पंथावर चालतात की सतशब्द या वैरागी पंथावर चालतात. ।।३।।

दोय पंथ दोय हे गेला ।। दो नाळा दो बाणी ।।
सुखदेव कहे सुणो सामीजी ।। किसी राह तुम जाणी ।।४।।

हे स्वामी,जगात गृहस्थी व वैरागी असे दोन पंथ आहेत,तसेच गर्भात येऊन अवागमनात राहण्याचा व गर्भापासून मुक्त होण्याचा अवागमनात न येण्याचा असे दोन रस्ते आहे.आदि पासून दोन नाळ आहेत एक संखनाळ आहे म्हणजे जेथून जगात आले तेथे पोहचण्याची नाळ आहे.म्हणजे पोहचून परत जगात येण्याची नाळ आहे. दुसरी बंकनाळ आहे म्हणजे घटात पश्चिमेने उलटून जगात परत जन्म न धारण करण्याची नाळ आहे.तसेच जगात दोन वाणी आहेत.एक वेद,शास्त्र,पुराणांची बावन्न

अक्षरांची मायेची वाणी आहे व दुसरी सुक्ष्म वेदाची बावन्न अक्षरांच्या पलिकडील ने:अक्षरांची वाणी आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी विचारले की,हे स्वामी, तुम्ही कोणत्या रस्त्याला जाणले आहे. ।।४।।

केसो पंथ तुमारो कहिये ।। कोण नाळ कूं छेदी ।।
सुखदेव कहे सुणो सामीजी ।। किसे पंथ का भेदी ।।५।।

हे स्वामी,तुमचा दोन माया तसेच सतवैराग्यामधील कोणता पंथ आहे?आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी स्वामीला विचारले की,तुम्ही माया पंथ धारण केला की, सतवैराग्य पंथ धारण केला आहे हे सांगा.तुम्ही संखनाळ छेदन केली का बंकनाळ छेदन केली हे सांगा ।।५।।

कोण तुमारा गुरू गुसांई ।। कोण तुमारो चेलो ।।
सुखदेव कहे सुणो सामीजी ।। कोण संग नित खेलो ।।६।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज स्वामीला बोलले की,तुम्ही गुरु गुसाई कोणाला धारण केले?हे स्वामी,तुमचा चेला कोण आहे?हे स्वामी,तुम्ही नित्य कोणाच्या सोबत खेळतात?।।६।।

सत्तशब्द हे गुरू हमारा ।। चित्त हमारो चेलो ।।
स्वामी कहे सुणो सुखदेवजी ।। मन सुरत संग खेलो ।।७।।

स्वामीने आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना सांगीतले की,माझा गुरु सतशब्द आहे व माझा शिष्य चित्त आहे.मी मन तसेच सुरत सोबत नित्य खेळतो.।।७।।

कोण शब्द सूं उठो बेठो ।। कोण शब्द ले ध्यावो ।।
सुखदेव कहे सुणो सामाजी ।। किसे शबद संग गावो ।।८।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी स्वामीला विचारले तुम्ही कोणत्या शब्दाच्या आधाराने नित्य उठता व बसतात.तुम्ही कोणता शब्द ध्यावतात व कोणत्या शब्दाच्या सोबत गातात. ।।८।।

सोऊँ शबद संग ऊठ बेठा ।। राम शबद कूं ध्यावाँ ।।
ओऊँ शबद सूं राग उचारा ।। सुरत सगत संग गावो ।।९।।

स्वामीने आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना सांगितले,मी नित्य सोहम शब्दा सोबत उठतो बसतो व राम शब्दाला गातो.तसेच ओअम शब्दाच्या सोबत रागरागिणींचा उच्चारण करतो व सुरत शक्तीच्या सोबत गातो. ।।९।।

कोण पुरूष को ध्यान धरो हो ।। कोण पुरूष कूं मारो ।।
केहे सुखराम सुणो सामीजी ।। कहो कोण कूं तारो ।।१०।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी स्वामीला विचारले की,हे स्वामी, तुम्ही कोणत्या

पुरुषाचे ध्यान धारण करतात व कोणत्या पुरुषाला मारतात.तसेच तुम्ही कोणत्या पुरुषाला मारतात व कोणत्या पुरुषाला तारतात? ।।१०।।

पारब्रम्ह को ध्यान धरा हाँ ।। पाँच पुरूष कूं मारा ।।
स्वामी कहे सुणो सुखदेवजी ।। प्राण पुरूष कूं तारा ।।११।।

स्वामीने आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना सांगितले की,मी पारब्रम्ह पुरुषाचे ध्यान धरतो व पाच पुरुषांना मारतो व प्राण पुरुषाला तारतो. ।।११।।

कोण काज तुम भेष पेरियो ।। कोण काज तम मांगो ।।
के सुखदेव सुणो स्वामीजी ।। देह काहि कूं भांगो ।।१२।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी स्वामीला विचारले की,तुम्ही हा वेष कोणत्या कारणाने घेतला आहे व कशाकरीता मागता आहात तसेच ह्या देहाला कशाकरीता गाळतात.।।१२।।

राम काज हम भेष पेरिया ।। खुद्या काज सो मांगाँ ।।
स्वामी कहे सुणो सुखदेवजी ।। मोख काज देह भांगाँ ।।१३।।

स्वामीने आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना सांगितले,मी रामजी प्राप्त करण्याकरीता वेष धारण केला आहे व देहाला भुक लागते म्हणून मी मागतो व मोक्षा करीता देहाला गळवितो ।।१३।।

किस के काज गोत कुळ छाड्यो ।। कोण काज बन सेवो ।।
के सुखराम सुणो स्वामीजी ।। जाब इसीको देवो ।।१४।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी स्वामीला विचारले की,तुम्ही कोणत्या कारणाने गोत्राचा त्याग करुन वनाचा रस्ता धारण केला आहे हे मला सांगा ।।१४।।

बेहद काज गोत कुळ छाडयो ।। राम काज बन सेवाँ ।।
स्वामी कहे सुणो सुखदेवजी ।। जाब अंत ओ देवाँ ।।१५।।

स्वामीने आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना सांगितले की,मी बेहदच्या कारणाने गोत्र,कुळाला त्यागले आहे व रामजी प्राप्त करण्याकरीता वनाचा रस्ता धारण केला आहे. स्वामीला आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी जे प्रश्न विचारले याचे उत्तर देणे कठिण पड्ले.तेंव्हा स्वामीने आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना सांगून दिले की, मी आता आपल्या कोणत्या प्रश्नाचे उत्तर देणार नाही.हे माझे आपल्या प्रश्नाचे उत्तर आहे हे समजून घ्या ।।१५।।

दोड्या फिरो जगत के मांही ।। बेण बिधो बिध बोलो ।।
केहे सुखराम सुणो स्वामीजी ।। काहा हेरता डोलो ।।१६।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी स्वामीला सांगितले की, जगात या गावाहून त्या

गावाला,त्या गावाहून पुढच्या गावाला धावत सुटतात व वेगळे वेगळे ज्ञान वचन बोलतात.तर तुम्ही संसारात कोणाला शोधत फिरतात?।।१६।।

**दोड़या फिरा मन का घाल्या ।। बेण टळण कूं बोला ।।**
**स्वामी कहे सुणो सुखदेवजी ।। संत हेरता डोला ।।१७।।**

स्वामीने आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना सांगितले की,मी मनाकरीता धावतो असतो व वचन टाळण्याकरीता बोलत राहतो तसेच संतांना शोधत फिरतो ।।१७।।

**किस कूं दवा बे दवा देवो ।। किस कूं ग्यान बतावो ।।**
**केहे सुखदेव सुणो स्वामीजी ।। चुपक कोण सूं ल्यावो ।।१८।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी स्वामीला विचारले की,तुम्ही आशिर्वाद कोणाला व शाप कोणाला देतात?तुम्ही केंव्हा गप्प राहतात व केंव्हा बोलतात? ।।१८।।

**जुग कूं दवा बे दवा देवां ।। मन कूं ग्यान बतावां ।।**
**स्वामी कहे सुणो सुखदेवजी ।। आपो देख संभावाँ ।।१९।।**

स्वामीने आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना सांगितले की,मी जगातील लोकांना आशिर्वाद व शाप दोन्ही देतो.जे माझी रीत धारण करतात त्यांना आशिर्वाद देतो व जे माझी रीत त्यागतात त्यांना शाप देतो.मी आपल्या मनाला ज्ञान सांगतो.मी माझ्या ज्ञानाची पोहच पाहून मी गप्प किंवा बोलत राहतो.माझ्या ज्ञानाची पोहच अधिक आहे तर बोलतो व ज्ञानाची पोहच कमी आहे तर चुप राहतो. ।।१९।।

**कोण तुमारी बेन भाणजी ।। कोण तुमारी माता ।।**
**के सुखदेव सुणो स्वामीजी ।। किसे ख्याल रंग राता ।।२०।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी विचारले की,तुमची बहिण भाची तसेच आई कोण आहे?तुम्ही कोणत्या खेळात रंगून लालमस्त राहतात? ।।२०।।

**सरम हमारी बेन भाणजी ।। सुता हमारी मांता ।।**
**स्वामी कहे ख्याल शिवरण के ।। सतशब्द सूं राता ।।२१।।**

स्वामीने आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना सांगितले की,लाज आपची बहिण भाची आहे व सत्ता आमची माता आहे.मी सतशब्दाचे स्मरण करण्याच्या खेळ रंगात लालमस्त आहे.।।२१।।

**पेरो पगाँ खडाऊँ खासा ।। जीव कीट कूं पेसो ।।**
**दरगे जाब केहे सुखदेवजी ।। कहो कूण बिध देसो ।।२२।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी स्वामीला विचारले की,तुम्ही पायात खडाऊ घालतात.त्याच्याने कित्येक किडे,किटक जीव जन्तु दाबले जातात.तडपून तडपून मरतात. याचे रामजीच्या दरबारात कसे उत्तर देणार? ।।२२।।

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

रामनाम हे शिंवरण मेरे ।। आठ पोहोर निरधारा ।।
स्वामी के हे कीट सो कीड़ी ।। पावे गत्त दवारा ।।२३।।

स्वामीने आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना सांगितले की,मी रात्र दिवस अष्टो प्रहर राम स्मरण करीत असतो व मी माझ्या मायेच्या आधाराने न चालता रामजीच्या आधाराने माझे बल न पकड्ता निराधार होऊन चालतो.यामुळे माझ्या खडाऊंने दाबून मेलेले किडे,मकोडे जीवांची गती होऊन जाते. ।।२३।।

कैसी ढाल ठाठरी बांधो ।। को समसेर संभावो ।।
के सुखदेव सुणो स्वामीजी ।। कोण पुरूष शिर बावो ।।२४।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज स्वामीला विचारतात की,ढिल ठाठरी सारख्या लढाई मध्ये जातांना शत्रु पक्षापासून वाचण्याकरीता बांधतात असे काळापासून वाचण्याकरीता तुम्ही ढाल,ठाठरी कोणाची बांधतात.जसे लढाईत शत्रुला मारण्याकरीता तलवार ठेवतात तसे तुम्ही काळाला मारण्याकरीता कोणती तलवार ठेवतात?तुम्ही तलवार कोणत्या पुरुषावर चालवतात?।।२४।।

धीरज ढाल ठाठरी बांधा ।। लिव समसेर समावाँ ।।
स्वामी कहे कर्म के ऊपर ।। आ समसेर बुहावाँ ।।२५।।

स्वामीने आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना सांगितले की,मी धीरजची ढाल ठाठरी बांधतो व रामनामाच्या जीवाची तलवार ठेवतो.ही तलवार कर्माच्यावर चलावून कर्मांना कापतो. ।।२५।।

पंच हथियार जुगत का बांध्या ।। भेष राम को धाऱ्यो ।।
स्वामी केहे सुणो सुखदेवजी ।। हुलस मन ने माऱ्यो ।।२६।।

स्वामीने आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना सांगितले की,मी शूरवीरा सारखे पाची हत्यार ओठ,चोर,नाक,धार,फास युक्तिने बांधतो.तसेच मी पण पाची हत्यार युक्तिने बांधले आहेत.जसे शूरवीर वेष धारण करतो.असा मी देखिल रामजीचा वेश धारण केला आहे.शूरवीर जसे शत्रुला मारतो तसे मी ही भोगी मनाला मारतो. ।।२६।।

धूणी मांय जीव सो जाळयो ।। नित जळ जाय संतावो ।।
अे शिर करम बंधे नित स्वाँमी ।। केहे सुखदेव भेद बतावो ।।२७।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी स्वामीला सांगितले की,तुम्ही धुनी लावतात त्यात जीव जळून मरतात व नद्यांमध्ये जाऊन आंघोळ करतात.त्याच्यातही जीव सतावले जातात.याकारणाने अनेक तुमच्यावर शिरावर कर्म नित्य बांधले जातात.असे पाप कर्म न लागण्याचे तुमच्याजवळ काय उपाय आहे. ।।२७।।

जळ की देह जळ की काया ।। जीव जळी का होई ।।

स्वामी केहे भजन के नेडा ।। पाप न आवे कोई ।।२८।।

स्वामी आदि सतगुरु सुखरामजी महाराजांना बोलला,हा देह,हे शरीर पाण्यापासून बनले आहे.जलाचे जीव ही पाण्यापासून बनले आहेत व मी रामजीचे स्मरण करतो म्हणून जळून मरणाऱ्या जीवांचा तसेच पाण्यात सतावल्या जाणाऱ्या जीवांचे पाप माझ्या स्मरणाच्या कृपेने माझ्याजवळही येत नाही म्हणून हे पापकर्म मला लागत नाही.।।२८।।

आवो स्वाँमी राम राम हे ।। प्रेम प्रीत को भाई ।।

के सुखदेव त्रिगुटी लंगिया ।। बैठ बराबर आई ।।२९।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी स्वामीला सांगितले की,हे स्वामी,माझा प्रेम प्रीति पूर्वक राम राम स्वीकारा हे स्वामी राम राम करुन तुम्ही घटात उलटून त्रिगुटी उल्लघंन केली आहे तर तुम्ही माझ्या बरोबरीचे आहात म्हणून तुम्ही खाली न बसता माझ्या बरोबर येऊन बसा ।।२९।।

पूरब दिस चडया जे ऊँचा ।। खेच पवन कूं सोई ।।

तो सुखदेव कहे स्वॉमीजी ।। देश मिले नहीं कोई ।।३०।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले,हे स्वामी,तुम्ही पूर्व दिशेने पवन खेचून खेचून वरती भृगुटीत चढले असाल तर माझा व तुमचा देश वेगळा आहे एक नाही. म्हणून देशाच्या गोष्टी मिळणार नाही.तुमचा जगात गर्भात येण्याचा रस्ता आहे तर माझा गर्भातून सुटून अमरलोक जाण्याचा रस्ता आहे. ।।३०।।

देश मिल्याँ बिन चरचा सूं ।। कीयाँ सुख नहीं पावो ।।

ताते कहे सुणो सुखदेवजी ।। जीम उलट घर जावो ।।३१।।

माझे तुमचे वेग वेगळे देश राहील्याने देश भेटणार नाही,यामुळे अमर देशाची चर्चा केल्यावर तुम्हाला सुख मिळणार नाही.म्हणून स्वामी तुम्हाला मी निवेदन करतो की, तुम्ही भोजन करुन परत तुमच्या घरी जा.।।३१।।

दसवे द्वार पूतिया सामी ।। तो तम गुरूं हमारा ।।

केहे सुखदेव ढोलिये आवो ।। मै हुँ शिष तुमारा ।।३२।।

हे स्वामी,तुम्ही दहाव्याद्वारात पोहचले आहात.तर तुम्ही माझे गुरु आहात माझे गुरु असल्या कारणाने तुम्ही पलंगावर येऊन बसा व मी आपला शिष्य असल्या कारणाने पलंगाच्या खाली बसतो. ।।३२।।

अनहद लांघ लंघीजे बारी ।। तो पर दिखणा देऊँ ।।

के सुखदेव सुणो स्वामीजी ।। नी तर शिष कर लेऊँ ।।३३।।

अनहद पार करुन म्हणजे दहाव्याद्वाराची वारी पार करुन दहाव्याद्वाराच्या पलिकडे पोहचले आहात तर मी आपणास प्रदक्षिणा देतो.जर आपण दहावेद्वार नाही उघडले

आहे दहाव्याद्वारात पोहचले नाही आहात,त्रिगुटी पार केली नाही आहे तर हे स्वामी, तुम्ही माझे शिष्य बनून जा.मी तुम्हाला शिष्य करुन त्रिगुटी पार करवून दहाव्याद्वाराच्या पलिकडे पोहचवून देईल. ।।३३।।

**सीखी बात आगली कहोगा ।। यारे करू न कोई ।।**
**के सुखदेव तुमारे घर हे ।। सो बिध कहो बजाई ।।३४।।**

तुम्ही जर आधी झालेल्या संतांच्या गोष्टी शिकून मला सांगाल तर त्या गोष्टी मला कबुल(मान्य)होत नाही.आदि सतगुरु सुखरामजी महाराज स्वामीला बोलले ज्या गोष्टी तुमच्या घटात झाल्या आहेत त्या गोष्टी फक्त मला सांगा ।।३४।।

**ज्याँरे घरे अणंद धन हुवा ।। त्याँ सुख पाया सोई ।।**
**के सुखदेव बखाण्या लारे ।। काहा मिलेगा तोई ।।३५।।**

ज्यांच्या घरी आनंद धन झाले त्यांनाच आनंद धनाचे सुख मिळाले.दुसऱ्यांना नाही मिळत म्हणजे सांगणाऱ्याना नाही मिळत म्हणून जर तुम्ही आधी झालेल्या संतांचे आनंद धन सांगाल तर तुम्हाला तुमच्या घटात आनंद कसा मिळेल. ।।३५।।

**त्रिगुटी लग शिष हे मेरा ।। बारी लंघे स भाई ।।**
**के सुखदेव सुणो सामीजी ।। दसवे गुरू सहाई ।।३६।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी स्वामीला सांगितले की,जर तुम्ही त्रिगुटी पर्यंत पोहचले आहात तर तुम्ही माझे शिष्य आहात व त्रिगुटीची बारी पार करुन त्रिगुटीच्या पुढे पोहचले असाल तर माझ्या गुरुसारखे माझे गुरु आहात ।।३६।।

**ध्यान शबद की सब की मत मे ।। जे समझत हो नाही ।।**
**के सुखदेव रीस नहिं स्वांमी ।। बेस ओट ले जावी ।।३७।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज स्वामीला सांगतात सतशब्द ध्यानाची हिकमत जाणत नाही तर स्वामी क्रोध आणू नका व आतापर्यंत माझ्या सोबत बरोबरीचे बनून बसले होते.आता बरोबरीचे आहात म्हणून उठून जा व परत आपल्या घरी जा.।।३७।।

**जे तम अड़ो ग्यान ले सामी ।। तो बलहारी लेऊँ ।।**
**के सुखदेव गुरू होय जासो ।। काय शिष कर देऊँ ।।३८।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज स्वामीला बोलले जर तुम्ही माझ्या जवळ जे ज्ञान आहे त्याच्या वरचे ज्ञान सांगून मला ज्ञानाने अड्वाल तर मी तुमच्यावर माझे प्राण अर्पण करुन देईल व तुम्हाला माझा गुरु बनून घेईल.जर तुम्ही मला माझ्यापेक्षा वरचे ज्ञान सांगू शकत नाही व मला सतज्ञानात अटकवू शकत नाही व माझ्या ज्ञानाने चर्चेत अटकून जातात.तर तुम्ही माझे शिष्य बनून जा मी तुम्हाला शिष्य करुन घेईल.।।३८।।

**ग्यानी सो हे शिष हमारा ।। भेदी सो गुरू भाई ।।**

के सुखदेव अग्यानी जुग मे ।। ज्याँरी कहुँ न काई ।।३९।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी स्वामीला सांगीतले की,जो सतस्वरुपाचे सतज्ञान जाणतो.पंरतु त्याच्या घटात सतज्ञानाचा भेद प्रगट झाला नाही आहे तो माझा शिष्य आहे व ज्याच्या घटात सतज्ञानाचा भेद प्रत्यक्ष प्रगट झाला आहे तो माझा गुरु भाऊ आहे व ज्याला सतज्ञानाचा भेद माहित नाही सतज्ञान माहित नाही व तरीही सतज्ञानाला अडतो,विवाद करतो तो जगात अज्ञानी आहे.त्याच्या अज्ञानतेला मी काहीच करु शकत नाही. ।।३९।।

ग्यानी मिल्याँ ग्यान मैं देऊँ।। भेदी कूं समजाऊँ।।

के सुखदेव अग्यानी आगे ।। हाथ जोड़ मै आऊँ।।४०।।

ज्ञानी मिळाला तर मी त्याच्या घटात सतज्ञान कसे प्रगट करावे याचा भेद देईल.भेदी मिळाला तर मी त्याला तो घटात जेथे पोहचला आहे.त्याच्या पलिकडे पोहचण्याचा भेद समजावेल.जो अज्ञानी आहे,जो सतस्वरुपाचे ज्ञान समजावले तरी ही समजू शकत नाही.उलट सतस्वरुपाच्या सतज्ञानाला उलटविती.अशा अज्ञानीच्या पुढे चर्चा करण्या करीता चर्चा करुन विवाद व्हावा.म्हणून मी त्यांच्या पुढे हात जोडूनच येईल. ।।४०।।

देही पेल काहा था स्वामी ।। कोण गेल होयं आया ।।

के सुखदेव अरथ ओ दिजे ।। काय शिष होय भाया ।।४१।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी स्वामीला विचारले की,ह्या जगात प्रथम देह धारण्याच्या आधी तुमचा जीव कोठे होता?त्या देशातून कोणत्या रस्त्याने जगात आले हा अर्थ सांगा.नाही तर माझा शिष्य होऊन जा. ।।४१।।

जुग में फिरो डोलता स्वामी ।। ग्यान जगत कूं दीया ।।

के सुखदेव नाँव तम लेवो ।। तको काहां कहाँ कीया ।।४२।।

हे स्वामी,तुम्ही संसारात संसारी लोकांना ज्ञान देत भटकत फिरतात व नाम धारण करण्याचे सांगतात ते नाम जे जगातील लोकांना धारण करण्यास सांगतात व तुम्ही ही घेतात ते नाम कोठून आले व कोठे पोहचवते ते सांगा. ।।४२।।

संत सुखरामजी स्वामी सूं चरचा कीवी अरथ उत्तर आपही कीया ।।

साखी ।।

राम राम सब मान करीज्यो ।। हर जन आया द्वारे ।।

के सुखराम रीज तो लेणी ।। भाव भगत के सारे ।।४३।।

याच्या पुढे आदि सतगुरु सुखरामजी महाराजांनी स्वामीला प्रश्न केले परंतु उत्तर स्वामीकडून न घेता आपणच दिलेत हरीजन आपल्या घटात आल्यावर सर्वानी त्याचा उच्च कोटीचा सन्मान केला पाहिजे.तसेच त्यांच्याशी प्रेमभाव करुन त्यांच्याकडून भक्तीचे

बक्षिस घ्यायला पाहिजे. ।।४३।।

शिष की दशा तके तो चरणा ।। आण लगो सब लोई ।।
के सुखराम तत्त हे ऊँचा ।। सो कोइ निवो न मोई ।।४४।।

जे लोक शिष्याच्या दशेत आहेत त्या सर्व लोकांनी त्यांच्या चरणी लागले पाहिजे.परंतु जो संत त्या संतापेक्षा उच्च तत्तचे आहेत ते कोणी ही त्यांच्या चरणी पडू नका.।।४४।।

निचे तत्त रहया जो बैठा ।। तो बुडोगा बातां ।।
के सुखराम समझ कर रहियो ।। गोळो मिलेगा जातां ।।४५।।

जे लोक त्यांच्यापेक्षा खालच्या तत्तचे आहेत ते जर आपल्या मनानेच त्या संताच्या समोर बनून राहून त्यांच्या सोबत बसतील तर ते बक्षिस मध्ये त्यांच्याकडून काही प्राप्त करणार नाही.उलट दोष बांधतील. ।।४५।।

त्रिगुटी लग वास हे तेरा ।। तो तळ ऊपर आवो ।।
के सुखराम अहुँ धर बैठा ।। दरगा दाद न पावो ।।४६।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले ज्या संताचा घटात त्रिगुटी पर्यंत वास आहे.ते संत खाली न बसता माझ्या बरोबरीत माझ्या बरोबरीने खाटेवर बसा.जर तुम्ही त्रिगुटीत पोहचलो नाहीत.अहमभावात येऊन माझ्या बरोबरीने येऊन बसाल.तर तुम्हाला दर्गेत दाद मिळणार नाही. ।।४६।।

ऊँचे तत्त उताऱ्याँ दोसण ।। कम तत रे सो बेठा ।।
के सुखराम न्याँव सूं रेणा ।। देख राज की पैठा ।।४७।।

जसे उच्च तत्तच्या संताला आपल्या जवळून खाली उतरविण्यात जितका दोष आहे. तितकाच दोष माझ्यापेक्षा कमी तत्तवाला माझ्या जवळ बसला राहीला तर त्याला दोष आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले हा दोष न्यायाने समजा व तसे सर्व रहा. जसे राजापेक्षा हलका मनुष्य म्हणजे प्रजा राजाच्या बरोबर बसू शकत नाही.त्याला दोष लागतो.तसेच राजापेक्षा उंच बादशहा त्याला राजा खाली नाही उतरवू शकत. त्याच्यात राजाला दोष लागतो.अशा संतांकरीता ही दोषाची विधि दर्गेतून बनली आहे. ।।४७।।

नीचे तत्त ढोलिये बैसे ।। ऊँच तत्त तळ आई ।।
के सुखराम दोस हे वा कूं ।। कहे संत सब भाई ।।४८।।

जर खालच्या तत्तचा संत उच्च तत्तच्या संताच्या बरोबरीत पलंगावर येऊन बसेल आणि उच्च तत्तच्या संताला खाली बसवेल तर बरोबरीत बसणाऱ्या संताला आणि बसविणाऱ्या संताला असे दोघांनाही दोष लागतात असे सर्व संत बंधू सांगतात. ।।४८।।

हरजन मिल्याँ पारखाँ कीजे ।। साख सबद को बाणी ।।
आ मनवार कहे सुखदेवजी ।। बोलो तत्त पिछाणी ।।४९।।

हरीजन भेटल्यावर त्यांची परीक्षा करा आणि त्यांच्या मुखाने साखी,शब्द आणि वाणी ते ऐकवण्याचा आग्रह करा आणि त्यांचा तत्तसार ओळखून त्यांना तशा आदराने ठेवा. ।।४९।।

दरगे दाद साच सूं पासो ।। झूठ कहयाँ हर खीजे ।।
के सुखराम जहाँ लग पूगा ।। सोई जाब सत्त दीजे ।।५०।।

हरच्या दग्यात सत्य उत्तर दिल्याने हरकडून दाद मिळते तर खोटे सांगितल्याने हर चिडतो.म्हणून तुम्ही जेथे पोहचले आहात ते खरे खरे उत्तर द्या खोटे बोलू नका. ।।५०।।

साधाँ कहो से नाणी वा की ।। मै बुजण कूं आया ।।
के सुखराम ढोलियो छाडो ।। काय अरथ दे भाया ।।५१।।

स्वामी तुम्ही दहाव्याद्वारी पोहचले आहात याची काय निशाणी आहे.हे जे मी विचार करुन राहीलो आहे याचा अर्थ म्हणजे उत्तर द्या.उत्तर नाही देता येत तर पलंगावरुन उतरुन खाली बसा. ।।५१।।

गुरू मुख होय ग्यान जो माना ।। समज सोच रे भाई ।।
के सुखराम अरथ सो दीजे ।। काय बेस तळ आई ।।५२।।

तुम्ही गुरुच्या सन्मुख होऊन गुरुच्या ज्ञानाने समजून विचार करुन मला सांगा.आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले,एक तर मी विचारतो त्या गोष्टीचा अर्थ द्या किंवा खाली उतरुन बसा.।।५२।।

मै बूजूं तुम कहो उचारी ।। तुम बूजो मैं भाखूं ।।
के सुखराम मिल्या से मूंडे ।। भरम काहे को राखूं ।।५३।।

मी विचारतो त्याचे उत्तर नाही येत असेल तर तुम्ही विचारा मी उत्तर देतो आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले आपण समोरा समोर भेटले आहोत मग जराही भ्रम कशाकरीता ठेवावा. ।।५३।।

बोलो सत उचारो बाणी ।। अहुँ भाव कूं छाड़ो ।।
के सुखराम साध सूं मिलियाँ ।। कुबध रांड कूं काड़ो ।।५४।।

सत्य बोला आणि वाणीचे उच्चारण करा व साधूशी भेटल्यावर अहम म्हणजे मोठ्या भाव सोडून कुबुध्दी रांडेला काढून टाका असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।५४।।

हंस हंस मिलो करोनी चरचा ।। हम आवाँ तम पासे ।।
के सुखराम पेप को क्या गुण ।। छेडया नेक न बासे ।।५५।।

साधू भेटल्यावर हसून हसून चर्चा करायला पाहिजे तुम्ही चाहत असाल तर मी तुमच्या

जवळ चर्चा करायला येतो.आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले फुलाचा काय गुण आहे.फुलाला छेडले फुलातून सुगंध पसरला नाही तर त्याला फूल म्हणून काय उपयोग? ।।५५।।

हरजन चाल जना के आया ।। आ मनवार करीजे ।।
के सुखराम भाव सो बाणी ।। अन जळ आण धरीजे ।।५६।।

हरीजन चालून घरी आले आहेत तर त्यांना सतज्ञान ऐकवण्याची विनंती करा.त्याच्यांशी भाव आणा,त्यांच्याशी गोड गोड वाणी बोला व अन्न व पाणी ग्रहण करण्याची विनंती करा.।।५६।।

चरचा मांही पख नहिं लीजे ।। ग्यान करे सो केणा ।।
के सुखराम न्याव सो चोड़े ।। पकड़ खाट तळ देणा ।।५७।।

चर्चा करण्यात पक्षपात घेऊ नका जे सतज्ञान सांगतो तसेच बोला.त्याच्यात अंतर करु नका.न्यायाच्या सर्व गोष्टी स्पष्ट रुपाने उघड उघड करा व सतज्ञानात बाधा आणणाऱ्या कपटाला खाटीच्या खाली दाबा. ।।५७।।

दास भाव सारो कर लीजे ।। निवणं खिवण सूं रेणा ।।
के सुखराम बेस चरचा मे ।। पखे बेण नहिं केणा ।।५८।।

घरी आलेल्या हरिजनाशी सर्व प्रकारच्या दास भावाने रहा,नम्रतेने रहा.खिवण म्हणजे त्यांचे ज्ञान शब्द सहन करा.आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले त्यांच्या सोबत चर्चेत बसा.परंतु पक्षपाताचे वाक्य बोलू नका.सतन्यायाने बोला व सतन्यायाने समजा. ।।५८।।

चरचा माँय लातियाँ आवे ।। तोहि राम नहि कोपे ।।
के सुखराम भगत हे मेरी ।। संत सूर पग रोपे ।।५९।।

सतज्ञानाची चर्चा करण्यात लाठ्याही चालल्या म्हणजे मारामारी ही होऊन गेली तरी ही रामजी नाराज होत नाहीत.म्हणजे कोपत नाही.आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले,माझी भक्ती शूरवीरांची भक्ती आहे.कायरांची भक्ती नाही.याच्यात माझ्या भक्तीत शूरवीरच पाय रोवतील दुसरे नाही रोवणार.।।५९।।

देवे भेद कसर सो काढे ।। आप कढाई भाई ।।
के सुखराम संत सो सूरां ।। भोळ रखे नहिं मांही ।।६०।।

भक्तीचा भेद देऊन भक्ती धारण करण्याऱ्यांची सर्व कसर दूर करा व भक्तीच्या नियमानुसार उच्च संतां सोबत बसून स्वत: ही कसर काढा.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,जो संत आपल्या आतील भोळेपना ठेवत नाही तोच संत शूरवीर आहे हे सतज्ञानाने समजा. ।।६०।। ।। इति स्वामी को संवाद संपूरण ।।